**MHAK100010142023**

**<u>Cri.M.A./255/2023</u>**

**Arti Nitesh Rathod Vs. Nitesh Mahadeo Rathod**

<u>(निशाणी क्रमांक ०९ खाली आदेश दिनांक २१.०४.२०२५)</u>

१. अर्जदाराने दाखल केलेल्या महिलेच्या घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण कलम १२ या अर्जामधील गैरअर्जदार क्र. २ ते ८ यांची नावे कमी करण्याबाबत अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुतच्या अर्जाला अर्जदार हिने लेखी जबाब दाखल केला असून अर्जास विरोध दर्शविला आहे.

२. गैरअर्जदार क्र. २ ते ८ यांच्या म्हणण्यानसुार अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज घरगुती हिंसाचारापासुन महीलांचे संरक्षण या कायदयाअंर्तगत दाखल केला असून, अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार सर्व गैरअर्जदार यांनी तिच्यावर घरगुती हिंसाचार केला आहे. परंतु प्रस्तुतचे प्रकरण दाखल करण्याकरीता अर्जदार ही गैरअर्जदार यांच्यासोबत एकत्रीत कुटूंबात राहलेली असणे आवश्यक आहे. त्याबाबतचा कुठलाही दस्त अभिलेखावर दाखल नाही. वास्तविक पाहता, गैरअर्जदार क्र. २ ते ८ हे अर्जदार ही त्यांच्या घरी नांदण्यासाठी आल्यापासून वेगळे राहत आहेत. त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार क्रमांक २ ते ८ यांचा संयुक्त कुटूंबामध्ये राहण्याचा कुठलाही संबंध आलेला नाही. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार हिने केवळ कायदयाचा दुरूउपोयग करून गैरअर्जदार यांना त्रास देण्याच्या उददेशाने दाखल केला आहे.

३. गैरअर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये सांगीतल्याप्रमाणे *मा. उच्च न्यायालय कर्नाटक यांचे नरसिम्हा वि. रोहीनी देवनाथन* या प्रकरणामध्ये नमूद केलेले आहे की, घरगुती हिंसाचारापासून महीलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १ अंतर्गत अर्जदार व गैरअर्जदार हे एकत्रीत कुटूंबात राहणे आवश्यक असते व तसा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक असते. परंतु प्रस्तुतच्या प्रकरणात तसा कुठलाही पुरावा अभिलेखावर आलेला

नाही. त्यामुळे गैरअर्जदार याने प्रस्तुतच्या अर्जातील गैरअर्जदार क्रमांक २ ते ८ यांना कमी करण्याची विनंती केली.

४. अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार हे स्वच्छ हाताने न्यायालयात आलेले नाहीत. अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार ती गैरअर्जदार यांच्यासोबत एकत्रीत कुटूंबात नांदत होती, त्याचबरोबर सर्व गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला कशाप्रकारे त्रास दिला याबाबत तिने तिच्या अर्जामध्ये सविस्तर नमुद केलेले आहे. अर्जदार हिचा सर्व गैरअर्जदार यांनी छळ केलेला आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांच्या अर्जदार हिच्याशी कुठलाही संबंध आला नाही असे म्हणता येणार नाही. छळ केल्याबाबतचा कुठलाही कागदोपत्री पुरावा नसतो. त्यामुळे गैरअर्जदार क्र. २ ते ८ यांची नावे प्रकरणातुन कमी करण्याची कुठलीही आवश्यकता नाही. सर्व गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा शारिरीक मानसिक छळ केलेला असल्यामुळे व सर्व गैरअर्जदार हे एकत्रीत कुटूंबाचा भाग असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खारिज करण्याची विनंती केली.

५. दोन्ही बाजुंना ऐकले. प्रस्तुतचे प्रकरण अर्जदार हिने गैरअर्जदार यांच्याविरूध्द कौटूंबीक हिंसाचारापासून महीलांचे सरंक्षण कायदयाच्या कलम १२ अन्वये दाखल केलेले असून गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार हिचा पती असून इतर गैरअर्जदार हे तिचे सासरचे लोक आहेत. प्रस्तुतच्या अर्जानुसार गैरअर्जदार क्र. २ ते ८ हे अर्जदार यांच्यासोबत राहत नसल्याचे सांगीतले व अशा परिस्थीत ज्यावेळी गैरअर्जदार हे कौटूंबीक नातेसंबध तसेच सामाईक घर या सज्ञेमध्ये बसत नसल्यामुळे त्यांची प्रस्तुतच्या प्रकरणातुन मुक्तता करण्याची प्राथना केली.

६. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये हे पाहणे आवश्यक आहे की, कौटूंबीक हिंसाचारापासून महीलांचे सरक्षंण अधिनियमानुसार पिडीत व्यक्ती, कौटूंबिक नातेसंबंध व सामाईक घर या सज्ञेमध्ये अर्जदार व गैरअर्जदार बसतात किंवा कसे. घरगुती हिंसाचार अधिनियमाच्या *कलम २(क) नुसार ''पिडीत व्यक्ती'' याचा अर्थ तिचा उत्तरवादी सोबत कौटूंबीक नातेसंबंध असेल किंवा राहीला असेल अशी आणि उत्तरवादीकडून जिच्याबाबतीत कोणतीही कौटूंबिक हिंसाचाराची कृती करण्यात आली आहे. असा आरोप करणारी कुठलीही महीला असा आहे.*

*७. कलम २ (च) ''कौटूंबिक नातेसंबंध'' म्हणजे जेव्हा दोन व्यक्ती रक्तसंबंधाने किंवा विवाहव्दारे किंवा विवाहसदृश्य नातेसंबंधाव्दारे, दत्तकसंबंधाव्दारे सामाईक घरात एकत्र राहत असतील किंवा कोणत्याही वेळी एकत्र राहीले असतील, किंवा संयुक्त कूटूंब म्हणुन एकत्र राहणा—या कूटूंबाचे सदस्य असतील अशा दोन व्यक्तीमध्ये नातेसंबध असा आहे.*

*८. कलम २ (ध)''सामाईक घर'' याचा अर्थ जे पिडीत व्यक्ती कौटूंबीक नातेसंबंधात एकटीच किंवा उत्तरवादीबरोबर राहत असेल किंवा कोणत्याही टप्प्यात राहली असेल असे घर असा आहे, आणि त्यात पिडीत व्यक्ती आणि उत्तरवादी यांची संयुक्तरित्या मालकी किंवा भाडेदारी तत्वार असलेले किंवा ज्याच्या संबंधीत पिडीत व्यक्तीचा किंवा उत्तरवादीचा किंवा त्या दोघांचा सयुंक्तपणे किंवा एकटयाने दोहोंचा सयुक्तपणे किंवा एकटयाने कोणताही हकक, मालकी हक्क, हितसंबंध किंवा समान अधिकार असेल अशा त्या दोघांपैकी कोणाही एकाची मालकी किंवा भाडेदारी तत्वावर असलेल्या घराचा समावेश असेल आणि त्यामध्ये उत्तरवादी ज्याचा सदस्य आहे अशा सयुंक्त कूटूंबाच्या मालकीचे असेल अशा घराचा त्या सामाईक घरामधील उत्तरवादीचा किंवा पिडीत व्यक्तीचा कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा हितसंबंध असो अगर नसो, समावेश असेल.*

९. वरिल तीनही संज्ञाचे विवेचन केले असता असे दिसून येते की, कौटूंबीक हिंसाचाराचे कलम लागु होण्याकरीता अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये कौटूंबिक नातेसंबंध स्थापीत होणे आवश्यक असते. त्याचबरोबर सामाईक घर हे सुध्दा महत्वाचा मुद्‌दा स्थापीत होणे आवश्यक असते. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये गैरअर्जदार हिच्या अर्जाचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येते की गैरअर्जदार क्र. १ ते ५ हे ग्राम पार्डी ता. मेहकर जि. बुलढाणा येथे राहत असून गैरअर्जदार क्र. ६ व ७ हे गावंडगावं ता. पातुर जि. अकोला येथे राहत असून, गैरअर्जदार क्र. ८ हे ग्राम असोला ता. चिखली जि. बुलढाणा येथे राहते. त्याचबरोबर अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये हे नमुद केले आहे की गैरअर्जदार क्र. ६ ते ८ हे अर्जदार हिच्या सासरी नेहमी मुक्काम करत असत व तिला त्रास देत असत. या ठिकाणी हे नमुद करावसे वाटते की, सामाईक घराचा अर्थ पिडीत व्यक्ती व कौटूंबीक नातेसंबंधात येणारी व्यक्ती यांनी एकत्रीत घरामध्ये काही काळ राहणे आवश्यक असते. ज्याअर्थी अर्जदार स्वत:

गैरअर्जदार क्र. ६ ते ८ यांचे राहणे पार्डी येथे राहत नसल्याचे मान्य करत आहे. त्याअर्थी गैरअर्जदार हे अप्रत्यक्षपणे हे मान्य करत आहेत आहेत की गैरअर्जदार क्र. ६ ते ८ हे सामाईक घरात राहत नव्हते.

१०. अशा परिस्थीतीत ज्याअर्थी गैरअर्जदार क्र. ६ ते ८ हे सामाईक कूटूंबातील घ टक असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे गैरअर्जदार यांनी नमुद केलेले *मा. उच्च न्यायालय कर्नाटक यांचे नरसिम्हा वि. रोहीनी देवनाथन* मधील स्थापीत सिंधात हा प्रस्तुतच्या अर्जाला लागु पडतो. ज्याअर्थी ते कौटूंबिक हिंसाचाराच्या कौटूंबिक नातेसंबंध या सज्ञेमध्ये बसत नाही. अशा परिस्थीत गैरअर्जदार क्र. ६ ते ८ यांच्या विरूध्द प्रस्तुतचा अर्ज चालु शकत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज अंशत: मंजुर करून खालील आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१. अर्ज अंशत: मंजुर करण्यात आला.

२. गैरअर्जदार क्र. ६ ते ८ यांची नावे प्रकरणातून वगळण्यात आली.

PRASAD SAHEBRAO THAKARE
Digitally signed by PRASAD SAHEBRAO THAKARE
Date: 2025.04.23 10:21:06 +0530

(प्रसाद एस. ठाकरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पातुर.

दिनांक: २१.०४.२०२५.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | K.M.Mahalle |
| Name of the Court | Prasad S. Thakare,<br>C.J.J.D. & J.M.F.C.,Patur. |
| Date of Order/Judgment | 21.04.2025 |
| Order/Judgment signed by the P.O on | 21.04.2025 |
| Judgment/Order uploaded on | 23.04.2025 |